Vol 3 Issue 4 Oct 2013

Impact Factor : 1.2018 (GISI)

ISSN No :2231-5063

# Monthly Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## International Advisory Board

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Golden Research Thoughts
Volume-3, Issue-4, Oct-2013
ISSN 2231-5063

Available online at www.aygrt.isrj.net

GRT

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धार्मिक विचार

## वामन रामराव वैद्य
सहा. प्राध्यापक, इतिहास विभाग एल. बी. एस. कॉलेज, परतूर

**सारांश :**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य जनसामान्यांसाठी संजीवक शक्ती, कोटयावधी जनतेच्या जीवनात प्रकाश आणणारा महामानव. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, स्वातंत्र्य, समता, बंधुत्व व सामाजिक, आर्थिक समता स्थापण करणाऱ्यांचे प्रेरणास्त्रोत म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. त्यांच्या तत्वज्ञानात सामाजिक अस्मिता जागृत करण्याची शक्ती आहे.

**प्रस्तवाना :**

अशा थोर महामानवाचा जन्म 14 एप्रील 1991 रोजी मध्यप्रदेशातील महू या प्रसिध्द गावी एका अस्पृश्य कुटुंबात झाला. त्यांच्या कुटुंबावर संत कबीर यांचा शिकवणीचा प्रभाव होता. त्यावेळी जी सामाजिक, धार्मिक परिस्थिती होती विशेषतः अस्पृश्यांच्या, दलितांच्या, आदिवासींच्या व स्त्रीयांच्या वाटयाला जे भोग आले ते मानवतेला कलंक फासणारे होते. हा कलंक पूसुन टाकयचा असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही. त्यांचे वडील रामजी हे सैन्यात होते. म्हणून नोकरी निमीत्त त्यांना महाराष्ट्रात सातारा, मुंबई येथे रहावे लागले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी इस 1900 साली पहिल्या वर्गात प्रवेश घेतला. इस 1904 साली त्यांचे वडील मुंबईला आले व 1907 साली दहावीची परीक्षा पास झाले. त्यावेळी दलितांचा मुलगा दहावी पास झाला ही फार कौतुकाची गोष्ट होती. दहावी नंतर त्यांनी एलफीस्टन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. शिक्षणासाठी महाराज सयाजीराव गायकवाड यांनी 25 रू. महिना शिष्यवृत्ती दिली. 1913 साली बी. ए. ची पदवी मिळविली. बडोदा संस्थानात नोकरी स्विकारली पण तेथे त्यांना अस्पृश्यतेची वागणुक मिळाली. ही गोष्ट महाराज सयाजीराव यांच्या कानावर आली. महाराजांनी बाबासाहेबांना कोलंबिया विद्यापीठात पाठविले. तेथे 1915 साली त्यांनी एम. ए. ची पदवी घेतली. त्यानंतर 1916 मध्ये लंडन विद्यापीठात भारतीय अर्थशास्त्रावर पीएच. डी. केली. शिक्षणामध्ये त्यांनी बॅरीस्टर ही पदवी सुध्दा घेतली. काही दिवस मुंबईला प्राध्यापक म्हणून नोकरी केली पण तेथे त्यांचे मन रमले नाही. त्यांनी समाजकार्य करण्याचे ठरविले. दलित समाजाच्या दुःखाची बीजे हिंदू धर्मात आहेत. म्हणुन त्यांनी आपले धार्मिक विचार मांडले.

''जो धर्म तुम्हाला शिक्षण घेवू देत नाही त्या धर्मात तुम्ही का राहता?जो धर्म तुम्हाला देवळात जावू देत नाही त्या धर्मात तुम्ही का राहता?जो धर्म तुम्हाला पाणी मिळू देत नाही त्या धर्मात तुम्ही का राहता? जो धर्म तुमच्या नोकरीच्या आड येतो त्या धर्मात तुम्ही का राहता?जो धर्म तुमची पदोपदी मानहानी करतो त्या धर्मात तुम्ही का राहता?ज्या धर्मात माणसाशी माणुसकीणे वागण्याची मनाई आहे तो धर्म नसून शिरजोरीची सजावट आहे त्याला अधर्म म्हणतात तो धर्म नसून एक रोग आहे?

ज्या धर्मात अमंगल पशुचा स्पर्श झाला तर चालतो पण माणसाचा स्पर्श चालत नाही, तो धर्म नसुन वेडगळपणा आहे. जो धर्म एका वर्गाने विद्या शिकू नये, धनसंचय करू नये, शस्त्र धारण करू नये असे सांगतो तो धर्म नसून मानसाच्या जीवनाचे विडंबन आहे. जो धर्म अशिक्षीतांना अशिक्षीत रहा, निर्धनांना निर्धन रहा अशी शिकवण देतो तो धर्म नसून ती शिक्षा आहे''.

हिन्दू धर्मातील भिषण वास्तवातून बाबासाहेबांच्या मनात धर्मांतराचा विचार उदयास आला. त्यांनी हिन्दू धर्माची तात्वीक मिमांसा केली ती महत्वाची आहे. धर्मांतरासंबंधी भूमिका मांडतांना त्यांनी पुन्हा – पुन्हा सामाजिक, धार्मिक, ऐहिक आणि तात्विक कारणांचा विचार केला आहे. धर्मा संबंधिची सुक्ष्म चिकीत्सा आणि धर्मांतरासंबंधिचा तर्कनिष्ठ विचार लक्षात न घेता भारतातील अनेक मुलतत्ववादी धर्मरक्षकांनी हैदोस मांडला. परंतू बुध्दिप्रामाण्यवादी बाबासाहेब प्राचिन, वैदिक, धर्मवेत्यांच्या विचारसरणीतील एकांतिक भूमिकेचे सप्रमाण खंडण करीत राहीले. बुध्द धर्माचे स्वतंत्रपण बाबासाहेबांना मान्य होते. ते म्हणतात, ''बुध्द धम्मात स्वातंत्र नसते तर दीड दोन हजार वर्ष या देशात वैद्यीक पंडीतांचा आणि बौध्द पंडीतांचा तात्विक संघर्ष का झाला असता? बौध्दांची स्थापत्य, कला यातही स्वतंत्र अस्तित्व आहे. तत्वज्ञानही स्वयंप्रकाशी आहे.''

''मनुष्यमात्राच्या उत्कर्षाला हानीकारक ठरणाऱ्या आणि मनुष्यमात्राला असमान व निच मानणाऱ्या माझ्या जुन्या हिन्दू धर्माचा मी त्याग करतो व बुध्द धम्माचा स्विकार करतो.''

डॉ. बाबासाहेबांच्या जीवित कार्याचे तीन टप्पे होते. 1930 पर्यंत त्यांनी अस्पृश्य दलितांना त्यांचे न्याय हक्क मिळवून देण्यासाठी संघर्ष केला हा पहिला टप्पा आहे. परंतू संघर्ष करून प्रश्न सुटत नाहीत म्हणून त्यांनी राजकीय सत्तेत सहभागी होवून सत्तेच्या माध्यमातून प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला हा त्यांच्या कार्याचा दुसरा टप्पा आहे. यातूनही अस्पृश्यांची गुलामगिरीतून मुक्तता होत नाही असे दिसून आल्यानंतर 1935 साली केलेली धर्मांतराची घोषणा प्रत्यक्ष अंमलात आणण्यासाठी प्रयत्न सुरु केले. धर्मांतरातून संपूर्ण दलितमुक्ती मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू केले ते जीवनाच्या अखेरपर्यंत, हा त्यांच्या जीवनाचा तीसरा टप्पा आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 1935 साली येवल्याच्या परिषदेत घोषणा केली की, ''मी हिन्दू म्हणून जन्माला आलो असलो तरी हिन्दू म्हणून मरणार नाही'' यानंतर नेमका कोणता धर्म स्विकारायचा यासाठी त्यांनी विविध धर्मांची चाचपणी केली. त्यांना अनेक धर्माच्या लोकांनी आमचा धर्म स्विकारा अशी विनंती केली.

1)इस्लाम धर्मीयांनी त्यांना इस्लाम धर्म स्विकारण्याची विनंती केली
2)ख्रिश्चन धर्मीयांनी त्यांना ख्रिश्चन धर्म स्विकारण्याची विनंती केली
3)शिख धर्मीयांनीही शिख धर्म स्विकारण्याची विनंती केली

अशी सर्व धर्मीयांची विनंती ऐकल्यानंतर बाबासाहेब संतगाडगेबाबा यांच्याकडे गेले. त्यांचे दर्शन घेतले आणि विचारले की, बाबा मला हिन्दू धर्माचा त्याग करून दुसरा धर्म स्विकारावयाचा आहे, तर कोणता धर्म योग्य राहील ते सांगा. गाडगे बाबा म्हणाले, ''बाबासाहेब तुम्ही एवढे हुशार विद्वान आहात आणि मी आडाणी तुम्हाला काय सांगु, पण बाबासाहेब म्हणाले नाही मला तुमच्या सल्ल्याची फार आवश्यकता आहे. मग गाडगेबाबांनी सांगितले इस्लाम व ख्रिश्चन धर्म सोडून कोणताही धर्म स्विकारा.'' बाबासाहेबांनी त्यांना आश्वासन दिले की मी भारतीय मातीतलाच धर्म स्विकारील.

### धर्मांतरातही भारतीयत्वाचा विचार –

कोणता धर्म स्विकारावा यासाठी त्यांनी विविध धर्मांचा अभ्यास केला आणि शिख धर्म स्विकारण्याचे ठरविले. ते पंजाबमध्ये अमृतसरला 1936 साली भरलेल्या शिख धर्म परिषदेला हजर राहीले. शिख धर्म का पसंत केला याचे स्पष्टीकरण त्यांनी दिले की, हिन्दु हिताच्या दृष्टीने कोणता धर्म योग्य राहील याचा सखोल विचार करून 1935 साली डॉ. बाबासाहेबांच्या धर्मांतराच्या घोषणेनंतर धर्मांतर करू नका असा सल्ला महात्मा गांधींनी बाबासाहेबांना दिला होता. त्यावर बाबासाहेब थांबले आणि म्हणाले, ''हिन्दू धर्मात समानतेची वागणुक दिली पाहिजे, तसेच मंदिरात प्रवेश दिला पाहिजे. त्यासाठी पंढरपुर मंदीर प्रवेश आंदोलन झाले. काळाराम मंदीर प्रवेश आंदोल झाले पण अस्पृश्यांच्या मंदीर प्रवेशाला समाजातून फार विरोध झाला. तेव्हा बाबासाहेबांनी धर्मांतराचा निर्णय पक्का केला आणि विचार केला इस्लाम धर्म किंवा ख्रिश्चन धर्म स्विकारला तर हिन्दु धर्माच्या कक्षेबाहेर अस्पृश्य समाज जातो. किंवा हिन्दु संस्कृतिबाहेर जातो. म्हणून इस्लाम आणि ख्रिश्चन धर्म न स्विकारण्याचा निर्णय घेतला व शिख धर्म स्विकारण्याचा विचार केला.

इस्लाम धर्म स्विकारला तर अस्पृश्य अराष्ट्रीय होतील व इस्लाम धर्मीयांची संख्या दुप्पट होईल व मुस्लींमांचे वर्चस्व वाढेल. ते हिन्दु धर्मीयांना त्रासदायक होईल. जर ख्रिश्चन धर्म स्विकारला तर ख्रिश्चनांची संख्या पाच–सहा कोटी होईल. मग ब्रिटीश सत्तेची या देशावरील मगरमिठी घट्ट बसेल. त्यामुळे

हिंदुस्थानच्या भवितव्याला धोका निर्माण होईल. नंतर बाबासाहेबांनी शिख धर्माचा स्विकार करण्याचा विचार सोडुन बौध्द धर्म स्विकारण्याचा निर्णय घेतला. अनेक धर्मांचा परामर्श सतत 20 वर्ष तुलनात्मक अभ्यास करून मग ठरविले की, माणुसकी ओळखणारा, प्रज्ञा, करूणा, शांती, अहिंसा आणि शिल अशी तत्वे पाळणारा कमीत कमी कर्मकांड असणारा आणि सर्वसामान्य माणसांना आचरता येणारा बौध्द धर्म आहे. बौध्द धर्मात स्वातंत्र, समता, बंधुत्व हि लोकशाहीची तत्वे त्यांना दिसून आली. म्हणुन बाबासाहेबांनी लाखो अनुयायांसह नागपुरच्या दिक्षा भूमीवर ऑक्टोबर 1956 मध्ये त्यांनी बौध्द धर्मात प्रवेश केला.

धर्मांधता ही राष्ट्रहित, राष्ट्रीय एकता, राष्ट्र विकास, मानवी समानता, स्वातंत्र्य, बंधुत्व याला घातक आहे. तेथे लोकशाही मुल्य टिकणार नाही. भारताचा कोणताही धर्म नाही, मानवी दृष्टीकोनातून व्यक्तीच्या कल्याणाचा विचार विकसीत झाला पाहिजे. जनता आणि राष्ट्राच्या विकासामध्ये कोणत्याही प्रकारचे धार्मिक कृति किंवा धार्मिक हस्तक्षेप मान्य नाही. धर्म हा राष्ट्र व मानवी विकासाच्या आड येवू नये असे बाबासाहेबांना वाटत होते. असा सखोल विचार करून बाबासाहेबांनी बौध्द धर्माचा स्विकार केला. कारण बौध्दा धर्म स्विकारल्याने जुन्या बौध्द धर्मीयांना अस्पृश्य त्या धर्मात आल्यामुळे अडचण निर्माण होणार नाही. असा विचार करून बाबासाहेबांनी बौध्द धर्मच योग्य आहे, तो जगाला शांती देवू शकतो.

डॉ. बाबासाहेबांना कोणत्याही धर्माचा द्वेष नव्हता. त्यांचे म्हणणे असे होते की, धर्मामध्ये सर्वांना समानतेची वागणुक असावी. धार्मिक हक्क सर्व जातींना सारखे असावे. हिन्दु धर्म हा स्वातंत्र, समता व बंधुत्वाला मान्यता देणारा नव्हता. हिन्दू धर्मात हुकुमशाही होती. त्यांच्यामते धर्म नितीमत्तेची शिकवण देणारा, बुध्दीनिष्ठ, स्वातंत्र, समता आणि बंधुत्वाला मान्यता देणारा असावा. हाच खरा धर्म असतो. धर्म समाजस्वरूप असावा. लोकशाही आणि राष्ट्रीय ऐक्याच्या स्थापणेला धर्माने मदत केली पाहिजे. जो धर्म राष्ट्रीय एक्याला तडा देतो तो धर्म देश विघातक असतो. असे बाबासाहेबांचे मत होते. म्हणुन हिन्दु धर्मातील दोषावर उपाय शोधित असतांना त्यांना बौध्द धर्माचा पर्याय सापडला. बौध्द धर्मात स्वातंत्र, समता व बंधुत्व ही तत्वे दिसून आली. म्हणुन त्यांनी बौध्द धर्माची दिक्षा ऑक्टोबर 1956 साली घेतली आणि धर्मांतरानंतर काही दिवसातच दिनांक 06 डिसेंबर 1956 रोजी डॉ. बाबासाहेब हे बुध्दवासी झाले.

***संदर्भ ग्रंथसूची*** –

1)धनराज दहाट (संपादक), डॉ. बाबासाहेब आंबेडकर भाषणे आणि विचार, खंड 2.
2)गंगाधर पानतावणे (संपादक), डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभिवादन ग्रंथ.
3)Ed. Valerian, Radriguses, The Essential Writings, of B. R. Ambedkar.
4)चां. भ. खैरमोडे, डॉ. भीमराव रामजी आंबेडकर चरित्र, खंड 1 ते 12.
5)चां. भ. खैरमोडे, डॉ. आंबेडकर आणि हिन्दू कोड बिल.
6)बी. सी. कांबळे, समग्र आंबेडकर चरित्र, खंड 1.
7)डॉ. प्रकाश खरात (संपादन), डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे व बुध्द धम्म विषयक विचार, भाग 1.
8)शा. रा. पगारे, डॉ. आंबेडकरांचे धर्मांतर आणि नंतर.
9)चिंतामण मोरे, बुध्दाची शिकवण.
10)प्रभाकर वैद्य, डॉ. आंबेडकर आणि त्यांचा धम्म.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net